# ब्लॅक पँथर्सच्या निमित्ताने

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

**प्रस्तावना व लेखाची मांडणी**

साठ-सत्तरच्या दशकात अमेरिकेत उदयास पावलेल्या ब्लॅक पँथर्स चळवळीचा आढावा हा लेखाचा मुख्य हेतू आहे. भारतीय दलित चळवळीच्या दृष्टीने ब्लॅक पँथर्सचा अभ्यास हा जागतिक परिप्रेक्ष्याचा एक भाग आहे. सद्य:स्थितीतील जागतिक परिप्रेक्ष्याची सततची जाणीव एकूणच अशा प्रबोधनाच्या चळवळींसाठी आवश्यक वाटते. म्हणजे आपली चळवळ जागतिक पटलावर कोठे बसते; काय शिकू शकते, कोणते धोके, कोणत्या चुका टाळू शकते याचे भान येणे शक्य होते. म्हणून ब्लॅक पँथर्सच्या आढाव्याबरोबरच जागतिक परिप्रेक्ष्यावरही लेखात भर आहे.

हे परिप्रेक्ष्य दोन प्रकारे मांडले आहे. एक म्हणजे जगात इतरत्र ज्यांना दलित म्हणता येईल अशा समूहांची माहिती. दुसरे म्हणजे एकूण जागतिक परिस्थितीतील वर्तमान प्रक्रियांचा उल्लेख.

लेख मर्यादेत परिप्रेक्ष्याचा सखोल अभ्यास शक्य नाही. म्हणून इतरत्रच्या उपेक्षित समूहांचे एक उदाहरण, श्रीलंकेतील तमिळ दिले आहे. तसेच जागतिक सद्य:स्थितीतील महत्त्वाच्या वाटणाऱ्या फक्त तीन प्रक्रियांचा उल्लेख आहे. या वर्तमान प्रवाहांचा भारतीय जीवनावर, विशेषत: ग्रामीण दलित जीवनावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष, तात्काळ किंवा नजीकच्या भविष्यात पण निश्चित परिणाम होत असतो. त्यातही हे प्रवाह धर्मेतर असल्याने त्यांची दखल आवश्यक वाटते. लेखातील काही मते मान्य किंवा अमान्य होतील. पण लेखाचा प्रामाणिक उद्देश अशा चळवळी विस्तृत दृष्टिकोनावर आधारित असाव्यात हा आहे.

प्रथम ब्लॅक पँथर्सच्या उदयाआधीचा अमेरिकन संदर्भ दिला आहे. त्यावरून ही चळवळ तेव्हा व तशी का उभी राहिली हे कळावे. नंतर चळवळीची माहिती व योगदान आहे. दलित पँथर्सवर विपुल साहित्य उपलब्ध असल्याने त्या चळवळीची माहिती दिलेली नाही. तिच्या योगदानाची ब्लॅक पँथरच्या योगदानाशी तुलना वाचकास स्वत:ला सहज करता यावी म्हणून ती तुलनाही प्रत्येक मुद्द्यावर केलेली नाही. तरीही काही महत्त्वाचे मुद्दे नोंदले आहेत. या दोन चळवळींवर जागतिक प्रक्रियांचे परिणाम व शेवटी लेखाचे निरीक्षण आहे.

**ब्लॅक पँथर्सची पार्श्वभूमी**

ब्लॅक पँथर्स ही चळवळ अल्पायुषी होती. तिची उमेदीची वर्षं सात-आठच होती. पण आफ्रिकन-अमेरिकनांच्या ऐतिहासिक गुलामगिरीबरोबरच चळवळीच्या जन्माआधीच्या ५०-६० वर्षांच्या भूतकाळातील अनेक प्रक्रियांचा तो परिपाक होता म्हणून हा आढावा जरा विस्तृत आहे.

विशेषत: १९३० पासून १९७० पर्यंत अमेरिकेने दोन आघाड्यांवर नवीन धोरणे राबवली. देशाबाहेर हस्तक्षेप करणे हे पहिले धोरण. देशांतर्गत विविध आर्थिक व कायदेशीर तरतुदी करणे हे दुसरे धोरण. ही दोन्ही धोरणे संलग्न होती. आफ्रिकन-अमेरिकनांसाठी दोन्ही धोरणांचा परिणाम अनिष्ट झाला. या धोरणांतून ते वगळले तरी गेले किंवा अंमलबजावणीसाठी त्यांनी अवाजवी किंमत तरी मोजली.

१९३० आधी पहिल्या महायुद्धात (१९१४ ते १९१८) अमेरिकेने १९१७ पासून दोस्त राष्ट्रांच्या बाजूने व जर्मनीविरुद्ध हस्तक्षेप केले. नंतर दुसऱ्या महायुद्धात (१९३९ ते १९४५) अमेरिकेची भूमिका निर्णायक ठरली. जपानवरील अणुबॉम्ब हल्ल्याने महायुद्ध संपले आणि अमेरिका महाशक्ती झाली.

दरम्यान १९१० पासून रशियात कम्युनिस्ट राजवट आली आणि पूर्व युरोपमधील बरेच देश तिच्या प्रभावाखाली आले. त्याला शह म्हणून अमेरिका व पश्चिम युरोपातील लोकशाही देशांनी North Atlantic Treaty Organisation (NATO) ही संघटना स्थापन केली. १९५०-५३ मध्ये अमेरिका चीनबरोबर कोरियन युद्धात होती. रशियाविरुद्धच्या शीतयुद्धादरम्यान अनेक देशांतील स्वतंत्र आदर्शवादी किंवा डावीकडे झुकणारी सरकारे अमेरिकेने पाडली. (इराण, ग्वाटेमाला वगैरे) किंवा पाडण्याचे प्रयत्न केले. (क्युबा). मग व्हिएतनाम युद्ध १९५८ पासून वीस वर्षे चालले.

देशाबाहेरची आक्रमक धोरणे ही एक आघाडी होती. दुसरी आघाडी देशांतर्गत उभारण्यात आली. त्याला New Deal म्हणतात. १९३० च्या आधीची आर्थिक मंदी पुन्हा येऊ नये यासाठी New Deal राबवण्यात आले. त्यात सरकारने नागरिकांसाठी अनेक कल्याणकारी योजना राबवल्या. उदा. कामगार कल्याण योजना. परदेशी लढणारे सैन्य वाढवण्यासाठी सक्तीची लष्करी सेवा लागू करण्यात आली.

या पार्श्वभूमीवर 'नागरिक म्हणजे काय? नागरिक कोण?' हे प्रश्न आफ्रिकन-अमेरिकनांना सतावू लागले. त्या देशात जन्मला म्हणून त्या देशाचा नागरिक असणे ही कायदेशीर औपचारिकता होते. पण देशाच्या कामकाजात सक्रिय सहभाग असणे, आर्थिक निर्णय प्रक्रियेत वाटा असणे यामुळे राजकीय-आर्थिक नागरिकत्व येते. ही शक्यता आधीही कमीत कमी होती. New Deal ने ती जवळजवळ संपुष्टातच आली. सरकारच्या कल्याणकारी योजनांतून आपण पद्धतशीररीत्या वगळले जात आहोत हे लक्षात आल्यावर आफ्रिकन-अमेरिकनांचा देशापासून दुरावा वाढला. अमेरिका बाहेरच्या जगातही अन्याय करत आहे. इतर वर्णाच्या-वंशाच्या लोकांविरुद्ध युद्धे करत आहे. या युद्धांचा निकाल कसा लागेल ते ठरवत आहे आणि तोच प्रकार देशांतर्गत आपल्या विरुद्धही चालू आहे असा समज दृढ होऊ लागला.

त्या समजामागे १६०७ पासूनचा गुलामगिरीचा इतिहास होता.

गळ्याभोवती, कमरेभोवती साखळदंड बांधून, अनेक लोकांना एकत्र बांधून कळपाने जहाजांच्या तळघरात कोंबण्यात आले व आफ्रिकेतून अमेरिकेत आणण्यात आले. प्रवासातील हालअपेष्टांनी, उपासमारीने, रोगराईने किती दगावले याची नोंदही नाही. १८६५ ला गुलामगिरी बेकायदेशीर झाली. पण हे लोक हीन ही समजूत गोऱ्या अमेरिकेच्या मानसिकतेत तोपर्यंत पक्की मुरली होती. एकूण लोकसंख्येच्या सुमारे १०-११ टक्के असणाऱ्या आफ्रिकन-अमेरिकनांच्यात गरीबी, व्यसनाधिनता, गुन्हेगारी, अल्प आयुर्मर्यादा यांचे प्रमाणे ५० टक्केहूनही जास्त होते. त्यात राहण्याची बकाल ठिकाणे, सरकारी किंवा खासगी नोकऱ्यांची शक्यता कमी, वगैरेची भर होती.

या ऐतिहासिक व तत्कालिन पार्श्वभूमीवर फर्द मोहम्मद या इसमाने 'नेशन ऑफ इस्लाम' ही संघटना स्थापन केली. तो मूळचा अमेरिकन नव्हता. आपण मक्केहून आलो व प्रेषित आहोत असे ते सांगत असे.

संघटना आफ्रिकन-अमेरिकनांचे जीवनमान सुधारण्यासाठी स्थापण्यात आली. १९३४ साली फर्द गायब झाला व एलिजा मोहम्मद नेशन ऑफ इस्लामचा नेता झाला. मुख्यत: चोऱ्यांखाली तुरुंगात असणारा माल्कम लिटल हा आफ्रिकन-अमेरिकन त्यांच्या संपर्कात आला. आफ्रिकन-अमेरिकनांची आडनावे गोऱ्या संस्कृतीतून आलेली म्हणून प्रत्येकाचे आडनाव 'X' असे ठेवायचे अशी नेशन ऑफ इस्लामची पद्धत होती. त्यानुसार माल्कम लिटल माल्कम 'X' झाला. तुरुंगातून सुटल्यावर तो या संघटनेचा सक्रिय सदस्य झाला व संघटनेत भराभर वरही सरकला. एलिजा मोहम्मदचे सात स्त्रियांशी विवाहबाह्य संबंध होते व त्यांच्यापासून त्याला तेरा मुलेही होती. या सगळ्यांचा खर्च संघटनेच्या तिजोरीतून चालत असे. त्यावरून मतभेद होऊन माल्कम एक्स नेशन ऑफ इस्लाममधून बाहेर पडला व त्याने 'मुस्लिम मॉस्क' आणि आफ्रो-अमेरिकन एकीसाठी एक संघटना स्थापन केली. तो सुन्नी मुस्लिमही झाला. त्याच्या मते आफ्रिकन-अमेरिकनांनी आफ्रिकेला तरी परत जावे किंवा अमेरिकेत स्वत:चे राष्ट्र स्थापावे. गोऱ्या अमेरिकेत त्यांना न्याय मिळणे अशक्य आहे. नागरी स्वातंत्र्यासाठी अहिंसात्मक, वैधानिक मार्गाने संघर्ष करणे त्याला पसंत नव्हते.

त्याने नेशन ऑफ इस्लाम सोडल्यावर एलिजा मोहम्मद व आणखी एक नेता लुई X (नंतर लुई फराखान, सध्याचा नेशन ऑफ इस्लामचा नेता) यांनी माल्कम विरुद्ध वातावरण निर्माण केले. परिणामत: १९६५ ला नेशन ऑफ इस्लामच्या कार्यकर्त्यांनी त्याला गोळ्या घालून ठार मारले. माल्कम एक्सच्या जहाल विचारसरणीचा पुढे ब्लॅक पँथर्सवर खूप प्रभाव पडला.

सामान्यत: ब्लॅक पँथर्सचे स्फूर्तिस्थान म्हणून फक्त माल्कम एक्सचे नाव घेतले जाते. परंतु दुसरा एक समकालीन आफ्रिकन-अमेरिकन कार्यकर्ताही स्फूर्तिस्थान होता. त्याचे नाव रॉबर्ट विल्यम्स. गोऱ्या वर्णद्वेष्ट्यांविरुद्ध आफ्रिकन-अमेरिकनांनी सशस्त्र लढा द्यावा, अशी त्याची स्पष्ट भूमिका होती. त्याच्या वैयक्तिक आयुष्यातील घटना पाहण्यासारख्या आहेत. त्यावरून तत्कालिन अमेरिकन समाज व शासन यांचा वर्णद्वेष लक्षात येईल.

आफ्रिकन-अमेरिकनांना राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रात समान हक्क मिळावेत यासाठी National Association for the Advancement of Colored People (NAACP) ही संघटना १९०९ ला स्थापन झाली होती. विल्यम्स तिचा पदाधिकारी होता. १९४३ सालचे अमेरिकेतील डेट्रॉईट शहरातील गोरे विरुद्ध आफ्रिकन-अमेरिकन दंगे त्याने प्रत्यक्ष पाहिले होते व गोऱ्यांच्या हिंसाचाराची त्याला चांगली कल्पना होती. गोऱ्यांच्या वर्चस्वाचा पुरस्कार करणारी (Ku Klux Klan - KKK) नावाची हिंसक संघटना अमेरिकेच्या दक्षिण भागात सक्रिय होती. (अजूनही काही प्रमाणात आहे.) आफ्रिकन-अमेरिकन निम्नमानव आहेत आणि तसेच ठेवले पाहिजेत हा त्यांचा आदर्शवाद. ही संघटना (NAACP) च्या एका पदाधिकाऱ्यावर हल्ला करणार असे कळल्यावरून विल्यम्स व त्याचे ५०-६० सहकारी त्याच्या घराचे सशस्त्र रक्षण करण्यासाठी गेले. KKK चे गुंड आले व दोन्ही बाजूंनी गोळीबार झाला. हल्लेखोर पळून गेले.

त्याकाळी अमेरिकेत सार्वजनिक ठिकाणी गोरे व आफ्रिकन-अमेरिकन अशी विभागणी काटेकोरपणे केली जात असे. पोलीस बहुसंख्य गोरे असल्याने त्याची अंमलबजावणीही होत असे. पोहण्याचे तलाव, लायब्ररी, बस अशा प्रत्येक ठिकाणी अस्पृश्य असल्यासारखे आफ्रिकन-अमेरिकनांना वेगळे ठेवण्यात येई. विल्यम्सने त्याच्या राहत्या शहरातील लायब्ररी व पोहण्याचा तलाव येथील ही विभागणी थांबवली. बसमधील अस्पृश्यतेविरुद्ध (Freedom Riders) नावाची संघटना कार्यरत होती. तिचे दोन्ही वर्णांचे अनुयायी बसमधून एकत्र प्रवास करत. विशेषत: या राज्याहून त्या राज्यात जायला आफ्रिकन-अमेरिकनांवर अनेक जाचक बंधने होती. १९६१ साली या बंधनांच्या निषेधार्थ Freedom Riders विल्यम्सच्या शहरात आले. त्यामुळे वातावरण तंग झाले. बरेचसे रस्ते पोलिसांनी बंद केले. त्यावेळी एक गोरे दांपत्य गाडीने शहरात आले. आफ्रिकन-अमेरिकनांच्या वस्तीतून जाणारा रस्ता मात्र खुला असल्याने ते त्या रस्त्याने जाऊ लागले. आफ्रिकन-अमेरिकनांनी त्यांना अटकाव केला. तेव्हा त्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांना विल्यम्सच्या घरी नेण्यात आले. वातावरण निवळेपर्यंत विल्यम्सने त्यांना आश्रय दिला.

पण पोलिसांनी 'त्यांचे अपहरण केले' असा आरोप विल्यम्सवर केला. ते अटक करणार हे लक्षात येऊन खटल्याचा ससेमिरा टाळण्यासाठी विल्यम्स व त्याचे कुटुंबीय ते राज्य सोडून पळाले. आता हा केंद्रीय अखत्यारीतला गुन्हा झाला म्हणून त्याच्यावर पकड वॉरंट निघाले. मग विल्यम्स कॅनडा, मेक्सिकोमार्गे क्युबाला व तेथून चीनला फरारी झाला.

या परदेशी वास्तव्यातही तो आफ्रिकन-अमेरिकनांच्या चळवळीत सक्रिय राहिला. व्हिएतनाम रेडिओवरून तो तत्कालिन घटनांवर भाष्य करत असे. व्हिएतनाम युद्धात त्याने आफ्रिकन-अमेरिकन सैनिकांना शस्त्रे हातात येताच देशाविरुद्ध बंड करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे तो देशद्रोही तर ठरलाच पण पोथीनिष्ठ कम्युनिस्ट अमेरिकनांना हा वर्गद्रोहही वाटला. कारण त्यांच्या मते गोरे व आफ्रिकन-अमेरिकन सैनिक एकाच वर्गाचे होते. मग डाव्या चळवळीने त्याला वाळीत टाकले. १९६८ साली तो अमेरिकेत आला. त्याला जुन्या अपहरणाच्या प्रकरणावरून लगेच अटक करण्यात आली पण सरकारने सगळे आरोप मागे घेतल्याने लगेचच सुटकाही झाली.

या जहाल आदर्शवादाबरोबरच त्या दरम्यान मार्टिन ल्यूथर किंगचा मवाळ आदर्शवादही लोकप्रिय होत होता. किंगने महात्मा गांधींची असहकार, कायदेशीर सविनयभंग, सत्याग्रह व ख्रिश्चन धर्मातील त्याला जोडून असणारी तत्त्वे यांच्यायोगे आफ्रिकन-अमेरिकनांना समान हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. ही सामोपचाराची भूमिका काही गोऱ्यांनाही मान्य होती. १९५५-६५ च्या दरम्यान या चळवळीने आफ्रिकन-अमेरिकन समाज उपेक्षित आहे एवढे तरी मुख्य प्रवाहाच्या निदर्शनास आणले. मात्र या अर्ज-विनंत्या करून गोऱ्यांची मानसिकता बदलणार नाही. या निर्णयाप्रत आफ्रिकन-अमेरिकनांचा एक प्रवाह येत होता. त्याला 'नेशन ऑफ इस्लाम'च्या मर्यादांचीही जाणीव होती. ती म्हणजे नेशन ऑफ इस्लामच्या आदर्शवादानुसार जरी धर्मांतर मोठ्या प्रमाणावर झाले. तरी होणारा बदल आफ्रिकन-अमेरिकनांच्या सांस्कृतिक क्षेत्रापुरता मर्यादित राहिला असता. त्यांच्या राजकीय व आर्थिक उपेक्षेकडे नेशन ऑफ इस्लामकडे उत्तर नव्हते.

**ब्लॅक पँथर्स**

वरील पार्श्वभूमीवर ह्यू न्यूटन (Huey Newton) व बॉबी सील (Bobby Seale) या दोघांनी ऑक्टोबर १९६६ मध्ये ब्लॅक पँथर्सची स्थापना केली.

न्यूटन अतिशय गरीब कुटुंबात जन्माला आला आणि १४ व्या वर्षांपासून भुरट्या चोऱ्या करत असे. त्यामुळे त्याला अनेकदा तुरुंगवास भोगायला लागला होता. नेशन ऑफ इस्लामशी तो परिचित होता. पण धर्म किंवा धर्मांतर यामुळे सामाजिक परिवर्तन शक्य होईल, यावर त्याचा विश्वास नव्हता.

बॉबी सीलचे वडील सुतार होते. तो अमेरिकन वायुदलात तीन वर्षे होता. वरिष्ठावर हल्ला करण्याच्या आरोपातून त्याला वायुदलातून काढून टाकण्यात आले. न्यूटन २२ तर सील ३० वर्षांचा असताना त्यांनी ब्लॅक पँथर्स स्थापली.

त्या आधी दोघेही स्थानिक गरीबी निर्मूलनाच्या कार्यक्रमात होते. Afro-American Association चे सदस्यही होते. पण ही संघटना फक्त गप्पा मारते, प्रत्यक्षात काहीच करत नाही असे मत होऊन त्यांनी ही संघटना सोडली. प्रथम ब्लॅक पँथर्सचे नाव ब्लॅक पँथर्स पार्टी फॉर सेल्फ डिफेन्स असे होते. कॅलिफोर्नियातील ओकलँड भागात आफ्रिकन-अमेरिकनांच्या वस्तीला पोलीस कायम त्रास देत असत. सुरूवातीचा उद्देश या त्रासाला उत्तर म्हणून तेथील युवकांना संघटित करणे इतका मर्यादित होता. मात्र लवकरच पोलीस ज्या व्यवस्थेचे नोकर आहेत त्या व्यवस्थेला आव्हान द्यावे लागेल हे त्यांनी ओळखले. माल्कम एक्स व रॉबर्ट विल्यम्सच्या प्रभावाखाली हे आव्हान प्रसंगी सशस्त्रही असेल असे ठरवले. त्यांचा दहा कलमी कार्यक्रम असा होता.

१) आमचे भवितव्य ठरवण्याचे स्वातंत्र्य आम्हाला हवे.

२) आमच्या प्रत्येक माणसाला रोजगाराची हमी हवी. गोऱ्यांच्या नियंत्रणाखालील उद्योगधंदे ही हमी कधीही देणार नाहीत. तेव्हा उत्पादनाची संसाधने (Means of Production ही कार्ल मार्क्सची संकल्पना) त्यांच्याकडून हिसकावून घेतली पाहिजेत व त्यांचे पुनर्वितरण झाले पाहिजे.

३) भांडवलशाहीने चालवलेले आमचे शोषण त्वरित बंद झाले पाहिजे. आम्हाला कसायला थोडी जमीन द्या. १०० वर्षांपूर्वी आम्हाला ४० एकर जमीन व दोन खेचरे देण्याचे आश्वासन दिले गेले होते. ते तरी पाळा. दुसऱ्या महायुद्धात केलेल्या ज्यूंच्या हानीबद्दल जर्मनी त्यांना नुकसान भरपाई देत आहे. त्यामानाने आमचे अधिक बळी पडले असूनही आम्हाला काहीच मिळालेले नाही.

४) माणसाला राहायला योग्य अशी घरे आम्हाला मिळाली पाहिजे. गोरे घरमालक ती देणार नाहीत म्हणून सरकारने मदत करावी. आमची घरे आम्ही सहकाराने बांधू.

५) आम्हाला शिक्षण हवे. सडलेल्या अमेरिकन समाजाचे खरे स्वरूप त्यायोगेच आमच्या मुलांना कळेल. आमचा इतिहास, आजच्या समाजातील आमचे स्थान त्यामुळेच कळेल.

६) आमचे रक्षण न करणाऱ्या सरकारला आम्हाला परदेशातील युद्धांसाठी अमेरिकन सैन्यात सक्तीने भरती करण्याचा अधिकार नाही. उपलब्ध साधनांनी आम्ही हा प्रयत्न हाणून पाडू. ही युद्धे भिन्न वर्णीयांवर लादले जात आहेत. आम्ही या पापाचे वाटेकरी होऊ इच्छित नाही.

७) आमच्या वरचे पोलिसी अत्याचार ताबडतोब बंद झाले पाहिजेत. आम्ही यापुढे या अत्याचारांचा घटनेने दिलेल्या शस्त्रे बाळगण्याच्या अधिकाराखाली सशस्त्र मुकाबला करू.

८) अमेरिकन तुरूंगात खितपत पडलेल्या सगळ्या आफ्रिकन-अमेरिकनांची सुटका करा. त्यांना योग्य न्यायदान झालेले नाही.

९) यापुढे कोणत्याही आफ्रिकनावर खटला भरला तर न्यायाधीश किंवा ज्युरी त्याच्या सामाजिक स्तरातील असले पाहिजेत. ते आजवर गोरे असल्याने त्यांना आरोपीची मानसिकता कळत नाही. हा घटनेने दिलेला अधिकार आहे.

१०) आम्हाला अन्न-वस्त्र-निवारा-शिक्षण-न्याय व शांतता हवी. संयुक्त राष्ट्रसंघाने फक्त आफ्रिकन-अमेरिकन मतदारांसाठी

सार्वमत घ्यावे. त्यांच्या कौलानुसार आम्ही या देशात रहायचे का नाही ते ठरेल.

भगवंताने प्रत्येक माणसाला समान निर्माण केले. ही समता जर एखादे सरकार नष्ट करत असेल तर ते सरकार उलथवण्याचा आम्हाला अधिकार आहे.

आपल्याकडच्या दलित चळवळींदरम्यान मार्क्सवाद व देवावरील किंवा प्रेषितावरील श्रद्धा यांतील अंतर्विरोध व तणाव ब्लॅक पँथर्सच्या जाहीरनाम्यापासून दिसून येतो. तसेच वर्ण व वर्ग यातील प्राधान्यक्रमाविषयी संदेह दिसतो.

आपल्या सशस्त्र संग्रामाची नांदी म्हणून कॅलिफोर्नियाच्या राजधानीमध्ये त्यांनी मे १९६७ ला एक सशस्त्र मोर्चा काढला. सार्वजनिक ठिकाणी शस्त्रे बाळगण्याच्या बंदीविरुद्ध हा मोर्चा होता. वाटच पहात असलेल्या पोलिसांनी बॉबी सील आणि ३० कार्यकर्त्यांना तेथेच अटक केली. एका पोलिसाच्या खुनाच्या आरोपावरून न्यूटनला ऑक्टोबरमध्ये अटक झाली.

शासकीय दमनचक्र इतक्या त्वरित सुरू होण्याचे प्रमुख कारण म्हणजे ब्लॅक पँथर्सच्या संस्थापकांची नेशन ऑफ इस्लाम व माल्कम एक्सशी असणारी आदर्शवादाची जवळीक हे असावे. नेशन ऑफ इस्लाम सरकारच्या मते द्वेष पसरवणारी, आफ्रिकन-अमेरिकनांना गोऱ्यांपेक्षा वरिष्ठ समजणारी, वर्णद्वेषी संघटना होती. तर माल्कम एक्स उघडपणे, सरकारविरोधी होता. त्यामुळे पँथर्स जेमतेम अस्तित्वात येताच पोलिसी खाक्या सुरू झाला.

१९६८ ला मार्टिन ल्यूथर किंगची हत्या झाली. त्या पाठोपाठ रॉबर्ट केनेडीची हत्या झाली. रॉबर्ट केनेडी माजी राष्ट्राध्यक्ष जॉन केनेडीचा भाऊ. तो गोरा असला तरी आफ्रिकन-अमेरिकनांच्या समस्यांबाबत सहानुभूत होता. किंगच्या हत्येनंतर रॉबर्ट विल्यम्सने (वर उल्लेख केलेला) आफ्रिकन-अमेरिकनांचे नेतृत्व करावे असा एक विचारप्रवाह होता पण ते झाले नाही. ही पोकळी ब्लॅक पँथर्सला इष्टापत्ती झाली असे म्हणता येईल कारण आफ्रिकन-अमेरिकनांना संघटित व आक्रमक म्हणून तेच दिसत होते. त्यामुळे या सुमारास त्यांची वाढ जोरात झालेली दिसते. बॉबी सील व ह्यू न्यूटनखेरीज एल्ड्रिज क्लीवर हाही महत्त्वाचा नेता होता. त्याने ब्लॅक पँथर्सचे अधिकृत वार्तापत्र चालवले. या पत्राचा खप अडीच लाखापर्यंत पोचला व सदस्य संख्या अडीच ते पाच हजारापर्यंत.

ब्लॅक पँथर्सचे नाव झाले व अनेक समविचारी संघटना हातमिळवणीसाठी पुढे आल्या. यांचा उल्लेख नंतर केला आहे. त्यातील एक म्हणजे Students National Coordination Committee (SNCC). त्याचा नेता स्टोकली कारमायकेल पँथर्सला सामील झाला. मग नेतृत्वात मतभेद सुरू झाले. कारमायकेल कोणत्याही गोऱ्याशी वैयक्तिक किंवा संघटनात्मक संबंध ठेवण्यास कबूल नव्हता. त्याच्या मते गोऱ्यांना आफ्रिकन-अमेरिकनांची मानसिकता समजणेच अशक्य असते. गोऱ्यांचा चळवळीतील सहभाग हा त्यांचा बृहत् समाजाची आफ्रिकन-अमेरिकनांबाबतची जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न असतो. एक गोरा जरी आपल्या बैठकीत आला, तरी चर्चा वर्णद्वेषावरच्या उपाययोजनांऐवजी बंधुभाव वाढवण्याकडे भरकटते. कारण आपण गोऱ्यांना घाबरून असतो. मुळात प्रश्न गोऱ्यांमुळे निर्माण झाला आहे. त्यामुळे खरोखर काही करण्याची इच्छा असेल तर त्यांनी त्यांच्यातच वर्ण-अंताची चळवळ सुरू करावी. तिला आपण सहयोग देऊ. राज्य त्यांचे, कायदे त्यांचे, शाळा, कॉलेजेस, कचेऱ्या, नोकऱ्या येथे आपल्याला प्रवेश नाही - ही परिस्थिती त्यांनी आणली. त्यामुळे त्यांच्यावरील अवलंबन संपवण्यासाठी आपल्या स्वत:च्या पतपेढ्या, सरकारी उद्योग, शाळा, कॉलेजेस आपण सुरू करायला पाहिजेत.

कारमायकेलचे हे विचार इतर नेत्यांना मान्य नव्हते. चळवळ वाढवायची असेल तर इतरांशी हातमिळवणी करावी असे त्यांचे मत होते. आपल्याकडच्या दलित-दलितेतर वादासारखाच हा वाद होता आणि तसेच परिणाम झाले. संघटनेत फूट पडली. १९७२ पर्यंत चळवळ खरेतर संपुष्टात आली पण १९८२ ला अधिकृतरीत्या बंद झाली.

न्यूटन, सील, क्लीवर, कारमायकेल १९६८ ते १९७४ दरम्यान चळवळ तरी सोडून गेले किंवा खोटे आरोप व नंतरचे कोर्टकब्जे टाळण्यासाठी देश तरी सोडून गेले. १९६८ नंतर इलेन ब्राऊन ही कवयित्री पँथर्सच्या अध्यक्षपदी आली. तिने समाजसुधारणेवर भर दिला. ती अध्यक्षा होण्याआधी सुरू झालेल्या कार्यक्रमांची आता नोंद घेऊ म्हणजे अल्पावधीत ब्लॅक पँथर्सने किती पल्ला गाठला ते कळेल.

स्टॅनफर्ड या अमेरिकेतील नामांकित विद्यापीठाने या कार्यक्रमांची यादी केली आहे. त्यानुसार एकूण ६५ कार्यक्रम राबवण्याचा पँथर्सचा प्रयत्न होता. त्यातील काही कार्यक्रम असे - समुदायाला मोफत आरोग्य सल्ला, लहान मुलांसाठी पाळणाघरे, अंमली पदार्थ व दारू या व्यसनांबाबत माहिती व ती सोडण्यास मदत, मोफत ॲम्ब्युलन्स सेवा, शाळेतील मुलांना मोफत नाश्ता, अपंगांसाठी मदत, मोफत कायदाविषयक सल्ला, हिवाळ्यासाठी मोफत उबदार कपडे, स्त्रियांसाठी स्वसंरक्षणाचे कराटेसारखे धडे, प्रौढ शिक्षण वर्ग वगैरे अनेक. हे कार्यक्रम वेगाने १९ शहरांमध्ये राबवले जाऊ लागले. शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत 'नाश्ता'चा कार्यक्रम तर विशेष लोकप्रिय झाला. मूळची गरीबी, त्यात शिक्षणाला कमी मूल्य या परिस्थितीत रिकाम्या पोटी मुले काय शिकणार? पण या योजनेमुळे, शाळेतील उपस्थितीत व मुलांच्या प्रगतीत लक्षणीय फरक पडला. आपल्याकडेही हा अनुभव आलेला आहे. सरकारच्या मते आफ्रिकन-अमेरिकनांना कम्युनिस्ट करण्यासाठी हा कार्यक्रम होता. पँथर्सनी चालू केलेल्या आरोग्य क्षेत्रातील सेवेचा उल्लेख आवर्जून करण्यासारखा आहे. ती दूरगामी होती आणि आपल्याकडच्या चळवळींना उद्बोधकही आहे.

त्यांनी अनेक आरोग्य केंद्रे उभारली. विशेष म्हणजे, अनुवांशिक

विकारांवर प्रकाश पाडला. हे विकार प्रामुख्याने आफ्रिकन-अमेरिकनांच्यात असल्याने मुख्य प्रवाहाच्या आरोग्य योजनांत त्यांचा समावेश नव्हता. ब्लॅक पँथर्सचा प्रयोग व्यावहारिक व तात्त्विक दोन्ही पातळ्यांवर होता. पारंपरिक औषधांनी आपली दुखणी आपणच बरी करावीत हा ग्रामीण भारतीय विशेषत: आदिवासी यांच्यासारखाच आफ्रिकन-अमेरिकनांचा कल या आरोग्य योजनेत लक्षात घेण्यात आला. मोफत आरोग्य केंद्रात रोग होऊ नये म्हणून मूलभूत प्रतिबंधक उपाय केले जात किंवा सांगितले जात. रक्तदाब, विषबाधा यांची चाचणी घेतली जात असे.

१९७१ मध्ये कृष्णवर्णीयांच्यातच विशेष करून होणाऱ्या sickle cell anemia या विकाराकडे लक्ष देण्यात आले. या विकारात रक्तातील लाल पेशी कडक होऊ लागतात. त्याचे शरीरावर अनेक अनिष्ट परिणाम होतात व आयुर्मर्यादा २०-३० वर्षांनी कमी होऊ शकते. त्याच्या चाचण्यांबरोबर त्याच्यासंबंधी लोकांना माहिती दिली जात असे.

आरोग्य हा मूलभूत हक्क आहे. आरोग्य व्यवस्था वर्णांधळी असली पाहिजे हे महत्त्वाचे मुद्दे ब्लॅक पँथरने पुढे आणले. आरोग्य व वर्ण यातील राजकारण त्याद्वारे समोर आले. हे सगळे कार्यक्रम जगण्याच्या किमान गरजा भागवण्यासाठी आहेत. ब्लॅक पँथर्सचे काम या कार्यक्रमानंतर थांबणार नाही याची स्पष्ट जाणीव त्यांना होती. त्यांचे उद्दिष्ट समाजात आमूलाग्र बदल घडवण्याचे होते. त्यासाठी तोपर्यंत जिवंत तर रहायला हवे. समूह शारीरिक व मानसिकदृष्ट्या सुदृढ तर हवा म्हणून हे कार्यक्रम. पोलिसांनी या कार्यक्रमांवर हल्ले करून दहशतीचे वातावरण निर्माण केले. उदाहरणार्थ, आरोग्य केंद्रातील औषधांच्या बाटल्या फोडणे, मुलांच्या नाश्त्याच्या अन्नाची नासधूस करणे वगैरे. हा विध्वंस ब्लॅक पँथर्सला नेस्तनाबूत करण्याच्या केंद्र सरकारच्या धोरणाचा भाग होता.

त्यासाठी ही मंडळी कम्युनिस्ट म्हणजे देशद्रोही असण्याचा दावा करण्यात आला. त्यात सशस्त्र लढ्याची पँथर्सची भूमिका या दमनचक्राला उपयोगी पडली. एकामागून एक कार्यकर्त्यांचा, पदाधिकाऱ्यांचा सरकारने काटा काढला. मुळात देशप्रेम, देशनिष्ठा म्हणजे काय? हे कोणतेच सरकार कधीच स्पष्ट करत नाही. मग प्रस्थापित आदर्शवादाला विरोध करणारा कोणीही देशद्रोही ठरतो. एडवर्ड स्नोडेनने सरकार सामान्य नागरिकांचे फोन, ईमेल, कोण कोणत्या वेबसाईटस् पाहतो याची नोंद ठेवते हे बाहेर काढल्यावर तो अमेरिकन सरकारच्या दृष्टीने आज देशद्रोही झाला आहे. भांडवलशाही-साम्राज्यवाद या अमेरिकन आदर्शवादाला विरोध करणाऱ्या नागरिकांवर Federal Bureau of Investigation (FBI) कायम नजर ठेवून असते. राजवटीला जे गैरसोयीचे ते विरोधक मानून त्यांना त्रास दिला जातो किंवा प्रसंगी खून केला जातो. या विरोधकांच्यात अनेक लोकांचा समावेश येतो. अमेरिकेत साम्यवादी, समाजवादी, युद्धखोरीस विरोध करणारे, अल्पसंख्याकांच्या नागरी हक्कांचा पुरस्कार करणारे, वार्ताहर, राजकीय नेते हे सगळे 'विरोधक'. त्यांना निनावी पत्रे पाठवणे. धमक्यांचे फोन करणे. सार्वजनिक बदनामी करणे, त्यांच्या सह्यांची खोटी कागदपत्रे संघटनेतील इतर सदस्यांना पाठवणे किंवा प्रस्तुत करणे (हा प्रकार क्लीवर अल्जीरियाला फरारी झाल्यावर तो व ब्लॅक पँथर्स यांच्यात एफबीआयने घडवला. परिणामत: क्लीवरला संघटनेतून काढून टाकण्यात आले.), खोट्या गुन्ह्यांखाली अटक करणे हे सगळे प्रकार ब्लॅक पँथर्सच्या बाबत घडले. कारण सरकारच्या मते राष्ट्राच्या सुरक्षेला ती संघटना सगळ्यात मोठा धोका होता.

१९६१ ते ६४ मध्ये वर उल्लेख केलेला रॉबर्ट केनेडी अमेरिकेचा ॲटर्नी जनरल होता. त्याने या धोरणास मान्यता दिली होती. विशेष म्हणजे, एफबीआय त्याच्यावरही नजर ठेवून होती. इतकेच नाही तर समाजवादी सहानुभूती आहे व अनेक सुधारणावादी संघटनांना पाठिंबा देतो म्हणून शास्त्रज्ञ अल्बर्ट आइनस्टाईनवरही नजर होती. या सगळ्या कार्यक्रमाचा खरा खलनायक एडगर हूवर होता. त्याने एफबीआय स्थापन केली. १९३५ पासून मृत्यूपर्यंत म्हणजे १९७२ पर्यंत तो एफबीआयचा डायरेक्टर होता. नेशन ऑफ इस्लाम, ब्लॅक पँथर्स अशा विरोधकांसाठी Counterintelligence Program - COINTELPRO आखण्यात आला होता. त्याचे सुकाणू अर्थातच ब्लॅक पँथरकडे वळले. त्यांच्या मार्क्सवादी आदर्शवादापेक्षा वर दिलेल्या कार्यक्रमांची वाढती लोकप्रियता हा सरकारला खरा धोका होता. कारण हे कार्यक्रम एक पर्यायी व्यवस्था निर्माण करत होते. कार्यक्रमांची लोकप्रियता फक्त सामान्यांपर्यंत मर्यादित राहिली नाही तर अनेक संघटनांनीही ब्लॅक पँथरला पाठिंबा तरी दिला किंवा संयुक्त आघाडीचा प्रस्ताव तरी मांडला. अशा काही संघटना पुढे दिल्या आहेत. त्या आधी अशा कार्यक्रमाविरुद्धच्या सरकारी हिंसेचे एक उदाहरण पाहू.

१९६८ साली ब्लॅक पँथर्सने बंदुका खरेदी करण्यासाठी माओचे 'रेड बुक' विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना विकण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हापासून ते कम्युनिस्ट असल्याचा शिक्का त्यांच्यावर बसला आणि दडपशाही अधिकृत झाली.

शिकागो शहरात वरीलपैकी काही मोफत कार्यक्रम पाच ठिकाणी व इतर ठिकाणी आरोग्य केंद्रे चालू झाली. शिकागोमधील कार्यक्रम चालवणारा फ्रेड हेम्प्टन हा ब्लॅक पँथर्सचा सदस्य होता. त्याने गुंड गँग्जनाही हिंसेपासून परावृत्त केले होते. गँगवॉर्समुळे दोन्ही पक्ष दारिद्र्यात खितपत राहतात हे त्याने त्या गुंडांना पटवले. आफ्रिकन-अमेरिकनांची एकी केंद्र सरकारला नको होती. त्यामुळे एकविसाव्या वर्षीच फ्रेड हॅम्प्टनची त्याच्या घरात घुसून, तो झोपलेला असताना पहाटे चार वाजता पोलिसांनी गोळ्या घालून हत्या केली. खोलीत बरेच जण होते. त्यातल्या आणखी एकाला ठार करण्यात आले. पण बाकी कोणालाही इजा झाली नाही. एकूण ९० गोळ्या झाडण्यात

आल्या. त्यातील फक्त एक दुसऱ्याच्या बंदुकीतून आली होती. बाकी गोळीबार पोलिसांनी केला. या कारवाईनंतर कोणत्याही पोलिसावर दोषी असल्याचा आरोप ठेवण्यात आला नाही. हॅम्प्टन व क्लार्क (दुसरा बळी) यांच्या कुटुंबियांनी शिकागो शहर, इसिनॉइस राज्य व केंद्र सरकार यांच्याविरुद्ध ४८ लाख डॉलर्सचा नुकसान भरपाई खटला दाखल केला. तो एकदा फेटाळला गेला पण जवळजवळ दहा वर्षांनी साडेअठरा लाख डॉलर्स नुकसान भरपाई मिळाली. बदललेल्या काळाचे लक्षण म्हणा किंवा या अन्यायाची उपरती म्हणा, शिकागो शहराने ४ डिसेंबर 'फ्रेड हॅम्प्टन डे' म्हणून जाहीर केला. त्याच्या नावाचा एक पोहण्याचा तलाव तेथे आहे व त्याचा अर्धपुतळाही नंतर उभारण्यात आला. केंद्र सरकारचे ६०-७० मधील ब्लॅक पँथर्सबद्दलचे धोरण असे हिंसक होते. (हॅम्प्टनच्या घराचा नकाशा, फर्निचर कोठे असते, तो कोठे झोपतो ही माहिती FBI ने पेरलेल्या खबऱ्याने दिली होती, असे नंतर उघडकीस आले. या इसमाने आत्महत्या केली.)

ब्लॅक पँथर्सबरोबर काम करण्याची उत्सुकता पुढील संघटनांनी दाखवली.

Peace and Freedom Party हा राष्ट्रीय स्तरावरचा पक्ष १९६६ पासून कार्यरत आहे. समाजवाद, व्हिएतनाम युद्धाला विरोध, वर्णवंशवाद निर्मूलन, पर्यावरणाचे रक्षण वगैरे त्याचे कार्यक्रम होते/आहेत. काही ब्लॅक पँथर्सवर अजूनही चौकशा, खटले चालू आहेत. त्यांना हा पक्ष मदत करतो. १९६८ मध्ये एल्ड्रिज क्लीवर या पक्षातर्फे अमेरिकेचा अध्यक्षीय उमेदवार होता.

Students for Democratic Society ही डावी विद्यार्थी चळवळ सक्रिय होती.

Student Non-violent Co-ordination Committee (SNCC) वर्णद्वेष निर्मूलन, नोकऱ्या व स्वातंत्र्य या क्षेत्रात विशेषत: अमेरिकेच्या दक्षिणेतील विद्यार्थ्यांना या संघटनेने बरीच मदत केली. तिचा एक नेता स्टोकली कारमायकेल ब्लॅक पँथर्समध्ये गेला.

Poor Peoples March मार्टिन ल्यूथर किंगच्या खुनानंतर आफ्रिकन-अमेरिकनांच्या आर्थिक न्यायासाठी ही संघटना निर्माण झाली.

अशा अनेक संस्था ब्लॅक पँथर्सशी सहयोगाला उत्सुक होत्या पण यश आले नाही. हे लक्षात यावे की, ब्लॅक पँथर्सचे खरे बळ पोलिसांशी झगडा करण्यापेक्षा समाजसेवेत होते. त्याचबरोबर त्यांनी गुन्हेगारीकडे वळणाऱ्या तरुण पिढीला विधायक कार्याकडे वळवले. अंमली पदार्थांचा व्यापार हा कोट्यवधी डॉलर्सचा भांडवलशाही उद्योग आहे हे उघड केले. सरकारची काळी बाजू प्रकाशात आणली. ते सहन न झाल्याने त्यांना दडपण्यात आले.

तरीही साहित्य, संगीत याद्वारे प्रस्थापित व्यवस्थेविरुद्धची टीका चालू राहिली. ती ब्लॅक पँथर्सनी निर्माण केलेल्या वातावरणामुळे बहराला आली व आज मुख्य प्रवाह ती स्वीकारतो. त्यात इलेन ब्राऊन ही महत्त्वाची साहित्यिका.

**ब्लॅक पँथर्स व स्त्रिया**

वर सांगितलेले ब्लॅक पँथरचे समुदायासाठीचे सगळेच कार्यक्रम 'पडद्यामागच्या' स्त्रियांच्या प्रचंड सहभागावर अवलंबून होते. पण त्यांची समानता कागदोपत्रीच राहिली.

याचे कारण म्हणजे वर्णद्वेष गौरेतर पुरुषांसाठी होता. या गृहीतानुसार स्वातंत्र्य हे पौरुषाचे द्योतक होते. गुलामगिरी, समाजातील निम्न स्थान हे पुरुषाचे ओझे होते. म्हणून ते झुगारायचे प्रयत्न आवश्यक होते. वस्तुत: आफ्रिकन-अमेरिकन स्त्रियांवर वर्ण व पुरुषप्रधान संस्कृती हे दुहेरी ओझे होते. परंतु त्याची जाणीवही नव्हती. अगदी इलेन ब्राऊन पँथर्सची अध्यक्षा झाल्यावरही तिला हा पूर्वग्रहदूषित आदर्शवाद दूर करता आला नाही याची तिने कबुली दिली आहे. तीही पुरुषांसारखीच वागू लागली. स्त्रियांविरुद्धचा हिंसाचारही दुर्लक्षिला जात असे. त्यामुळे बाहेरच्या जगातील वर्णद्वेषाबरोबर या स्त्रियांना चळवळीतही अवहेलना सहन करावी लागत असे. स्त्रियांना तुच्छ लेखणारी विधाने पुरुष हरघडी करत. तो संस्कृतीचा भाग मानला गेला.

६० च्या दशकातील स्त्रीवादाच्या उदयानंतर या स्त्रियांना स्त्रीवादी चळवळीतही वर्णभेद सहन करावा लागला. तेथे त्याबरोबरच 'आधी' वर्ण की 'आधी स्त्रीत्व' हा अनावश्यक वाद पुढे आला. हा आपल्याकडच्या 'आधी' जात की 'आधी' वर्ग या वादासारखाच. वर्गाच्या बाजूने कौल दिला तर चळवळीतल्या स्त्रीचे दुय्यम स्थान कायम राहिले व 'सर्व स्त्रिया (गोऱ्या व गौरेतर) समान' या गृहीतकालाही धक्का पोचला. स्त्रीत्वाच्या बाजूने कौल देण्यातही दुहेरी धोका होता. तशी भूमिका घेतली तर चळवळीचे 'सगळे कृष्णवर्णीय एक' या गृहीतकाला धक्का पोचत होता. त्याचबरोबरच तसे म्हणणे म्हणजे 'सर्व स्त्रिया समान' हे मान्य करणे होते. पण गोऱ्या व गौरेतर स्त्रिया समान नव्हत्या व आताही नाहीत. इथे वर्णभेद महत्त्वाचा ठरतो. आफ्रिकन-अमेरिकन स्त्रियांचा चळवळीत वर्ण-वर्ग-स्त्रीत्व या अंगाने विचारच झाला नाही. झाला तो प्राधान्यक्रमाच्या बागुलबुवाच्या अंगाने. शेवटी चळवळ नष्ट होण्याचे हेही एक कारण मानले जाते.

एक उदाहरण द्यायचे झाले तर त्याच्या स्वत:च्या उत्तरायुष्यातील कबुलीप्रमाणे एल्ड्रिज क्लीवर हा सततचा बलात्कार करणारा माणूस होता. 'प्रॅक्टिस' म्हणून आधी वस्तीतील कृष्णवर्णीय स्त्रियांवर तो बलात्कार करत असे. नंतर गोऱ्या स्त्रियांवर करू लागला. या कबुलीतसुद्धा गोरी स्त्री कृष्णवर्णीय स्त्रीपेक्षा श्रेष्ठ मानली आहे. वेदना, भीती व जखमा दोन्ही वर्णांच्या स्त्रियांना सारख्याच होतात. या गोष्टीकडे दुर्लक्ष आहे.

एकूण मुख्य प्रवाहातील स्त्री द्वेष्टेपणा ब्लॅक पँथर्समध्येही होता. ज्योती लांजेवार यांनी मध्यंतरी 'महिला पँथर'ची जरूरी सांगितली होती. तीही दलित पँथर्समधील अभावानेच आढळणाऱ्या स्त्रियांमुळे असावी.

**ब्लॅक पँथर्स व दलित पँथर्स**

लेखात ब्लॅक पँथर्सच्या संदर्भात प्रत्येक ठिकाणी 'दलित पँथर्स'ची भूमिका यासारखीच होती (किंवा नव्हती) असे म्हटलेले नाही. ती तुलना वाचक त्या-त्या मुद्द्याबाबत करू शकेल, तरीही काही महत्त्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे -

- दोन्ही चळवळींनी त्यांच्या त्यांच्या उपेक्षित समाजात आत्मभान निर्माण होण्याची प्रक्रिया पुढे नेली. अमेरिकेत ही प्रक्रिया १९०९ च्या NAACP च्या स्थापनेपासून तर भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाली होती. त्यामुळे साहित्य, संगीत, नृत्य, सिनेमा अशा विविध कला या प्रतिसंस्कृतीने भरारल्या.

- दोन्ही चळवळी पुरुषप्रधान राहिल्या. त्यामुळे त्या स्त्रियांसकट त्यांच्या संपूर्ण समाजासाठी होत्या असे म्हणणे कठीण आहे.

- दोन्ही चळवळी प्रामुख्याने शहरी होत्या. तत्कालिन अमेरिकेत हे समजू शकते. कारण तो समाजच (आफ्रिकन-अमेरिकन) शहरात एकवटलेला होता किंवा दक्षिणेच्या ग्रामीण भागाहून तेथे स्थलांतरित होत होता. पण भारतात ग्रामीण भागात जातीयतेचे वास्तव अधिक तीव्र व हिंसक असल्याने दलित पँथर्स त्या तळापर्यंत पोचणे महत्त्वाचे होते. उलट, काही वेळा या शहरी प्राधान्य असणाऱ्या कार्यक्रमांची झळ सर्व ग्रामीण दलितांना भोगायला लागली.

- ब्लॅक पँथर्सच्या समाप्तीत खुनशी शासनाचा वाटा मोठा होता. त्यांना संपवणे हे शासकीय धोरणच होते. त्यामुळे विशिष्ट व्यक्तींच्या खुनापर्यंत मजल गेलेली दिसते. हा प्रकार त्या प्रमाणावर भारतात घडल्याचे दिसत नाही.

- या अनुषंगाने ब्लॅक पँथर्सची प्रतिमाही हिंसक व व्यसनी तरुणांची संघटना अशी झाली. त्यांच्या नेतृत्वातही अंतर्गत मतभेद बंदुकीने मिटवायचे हा मार्ग दिसतो. फुटीनंतर दलित पँथर्सच्या महातेकर-संगारे गटाने शासनाकडे स्वसंरक्षणासाठी शस्त्रांची 'मागणी' केली. नक्षलवादी चळवळीसारखी शस्त्रं हातात घेतली नाहीत.

- दोन्ही संघटनांत निर्णय प्रक्रिया 'वरून खाली' राहिली. कारमायकेल पत्रकार परिषदेत धोरणे जाहीर करत असे. ती इतर नेत्यांनाही तेव्हाच कळत असत.

- तात्त्विक पातळीवर स्फूर्तिस्रोत जरी नेशन ऑफ इस्लाम, माल्कम एक्स आणि रॉबर्ट विल्यम्स असले तरी मार्क्स, लेनिन, माओवाद हा ब्लॅक पँथर्सचा आदर्शवाद राहिला. वैयक्तिक कारणे सोडा, दलित पँथर्समध्ये पहिली फूट मार्क्सवाद स्वीकारायचा का नाही यावर पडली. अशा वादांबरोबरच रिपब्लिकन पक्षाशी नाते तुझं नी माझं जमेना अन् तुझ्यावाचून मला करमेना - या धर्तीवर होता. निवडणुकांत सहभागासारख्या अशा व्यक्ती-कालापव्ययी धरसोडीच्या वृत्तीने कार्यकर्त्यांच्यात गोंधळ झाला.

- ब्लॅक पँथर्सच्या धोरणांना निश्चित आंतरराष्ट्रीय मिती होती. (भारतीय दलित चळवळी संदर्भात तिची आवश्यकता पुढे विशद केली आहे.) या मितीमुळे 'अमेरिकेने देशाबाहेर चालवलेल्या युद्धात आम्ही सहभागी होणार नाही' अशी स्पष्ट भूमिका ते घेऊ शकले. दलित पँथर्सबाबत तसे म्हणता येत नाही.

या तौलनिक मुद्द्यांनंतर दलित पँथर्सचे स्वत:चे योगदान व जाहीरनामे पाहू. जाहीरनाम्याखेरीज मागण्या, मोर्चे, उपोषणे वगळता काही विजय 'निष्पन्न काय झाले' या कसोटीवर पाहू.

- सरकारला शासकीय व बँकिंग क्षेत्रातील दलितांसाठीचा अनुशेष भरायला पँथर्सनी भाग पाडले.

- राजगुरूनगर तालुक्यातील आसखेड गावातील विठू मोरे या दलिताला त्यांनी त्यांची ३० एकर कसती जमीन सवर्णाच्या दंडेलशाहीतून सोडवून दिली.

- दोन कार्यकर्त्यांची आंबेठाण जवळच्या गोनवडी गावातील २४ एकर जमीनही अशीच ३५० कार्यकर्त्यांनी मूळ दलित मालकाला परत मिळवून दिली. पुणे जिल्ह्यातीलच येणेरे गावातील बौद्ध स्मशानभूमी परत बौद्धांच्या ताब्यात दिली.

- १९७४ - प्रा. कुकडे व प्रा. जोशी हे निपाणी, कोल्हापूरचे दोन प्राध्यापक. त्यांना दलितांविषयी सहानुभूती होती, त्यामुळे त्यांना नोकरीवर त्रास दिला जात असे. दलित पँथर्सने त्याविरुद्ध शिक्षण संस्थेशी संघर्ष केला. प्राध्यापकांना न्याय मिळवून दिला. त्या प्रकरणात दलित पँथर्सना मोहन धारियांच्या तेथे स्थानिक असणाऱ्या ज्येष्ठ बंधूंची मदत झाली.

- १९७४-७५ मध्ये गवई बंधूंचे डोळे काढण्याचे भयानक प्रकरण इंदिरा गांधींपर्यंत प्रत्यक्ष पोचवले व तत्कालिन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्यावर दडपण आणले.

वस्तुत: या कोणत्याच प्रकरणाला कोणत्याच आदर्शवादाची आवश्यकता दिसत नाही. अन्यायाचे निवारण ही सदसद्विवेकबुद्धीची प्रेरणा व संघटन यांची आवश्यकता दिसते. प्राध्यापकांच्या पुनर्वसनाचे प्रकरण सोडता शासनाचे काम पँथर्सनी केले असे म्हणता यावे.

पँथर्सच्या फुटीनंतरचे काही गटांचे जाहीरनामे पुढीलप्रमाणे - (संदर्भ - डॉ. लता मुदगकरांचे 'दलित पँथर चळवळ')

**ढसाळ गटाने पुढील कार्यक्रम जाहीर केले.**

झोपडपट्टीतील रहिवाशांचे स्थलांतर पर्यायी जागा दिल्यावरच योग्य हंगामात करावे. दादागिरी करणारे जमीनदार, दारुभट्ट्या चालवणारे व सावकार यांच्यावर सरकारने नियंत्रण ठेवावे. झोपडपट्टीतील विद्यार्थ्यांसाठी हॉल, ग्रंथालये, अभ्यासगृहे उभारावीत. काळा पैसा झोपडपट्ट्यांच्या विकासासाठी वापरावा इत्यादी. डॉ.मुदगकरांच्या शब्दांत 'यापैकी कुठल्याच कार्यक्रमाचा पाठपुरावा या गटाकडून नंतर झाला नाही.'

**१९७५ साली ढाले गटाने पुढील उद्दिष्टे जाहीर केली.**

देशातील सर्व दलितांच्या ऐक्यासाठी प्रयत्न करणे. त्यांना त्यांच्या हक्कांविषयी जागरूक करणे, दलितांच्या सहकारी बँका स्थापणे, बळकावलेल्या जमिनी परत देणे, राखीव जागांचा अनुशेष

भरून काढणे इत्यादी.

ढाले गटाने '७६ मध्ये अभ्यास मंडळे सुरू केली. तसेच 'मुक्तछंद' हे मासिकही काढले. त्यांनी दलितांसाठी वेगळे दलितस्थान स्थापन करावे लागेल असा इशाराही १९७८ साली दिला होता. प्रामुख्याने ढाले गटाचे काम बौद्धधर्म प्रसार व साहित्यामार्फत विचारांचा प्रसार असे होते. पण दलितांमधील निरक्षरतेमुळे यावर मर्यादा आल्या.

संगारे-महातेकर गटाने स्वसंरक्षणासाठी दलितांना शस्त्रे देण्याची मागणी केली व दलितांसाठी स्वतंत्र न्यायालये स्थापण्याचीही मागणी केली. या मागण्या ब्लॅक पँथर्सच्या जाहीरनाम्याजवळ जातात. तसेच त्यांनी अल्पसंख्याकांसारखे दलितांसाठी निराळे कमिशन नेमावे अशीही मागणी केली. या गटाने शिवडीतील काही गिरणी कामगारांची सावकारी कर्जातून सुटका केली.

कांबळे गटाने ब्लॅक पँथर्सपेक्षा नेशन ऑफ इस्लामच्या जवळ राहणारा जहालपणा जाहीरनाम्यात तरी दाखवला. त्यांनी दलितांना मिळणाऱ्या अपमानास्पद वागुणकीच्या निषेधार्थ भारतीय नागरिकत्व सोडण्याची घोषणा केली. स्वतंत्र दलितस्तानची मागणी केली व दलितांसाठी शस्त्रेही मागितली. ही भूमिका रॉबर्ट विल्यम्स व नंतर ब्लॅक पँथर्ससारखी होती. (अमेरिकेत भारताच्या मानाने शस्त्रे सहज उपलब्ध असल्याने त्या लोकांना ही मागणी सरकारकडे करावी लागली नाही.) एकीकडे नागरिकत्व सोडण्याची घोषणा तर दुसरीकडे फेब्रुवारी १९७६ ला विधानसभा निवडणुकीचे डावपेच ही ठरवण्यात येत होते.

**इतरत्रचे दलित**

यासाठी श्रीलंकेतील तमिळ हे उदाहरण बोलके आहे. दलित पँथर्स संदर्भात नाही तरी एकूण दलितांच्या संदर्भात ते उद्‌बोधक ठरावे.

श्रीलंकेत दोन भिन्न तमिळ समूह आहेत. देशाच्या उत्तर व पूर्व भागात इसवीसनापूर्वीच्या तिसऱ्या शतकापासून तमिळ स्थायिक झालेले आहेत. हे श्रीलंकन तमिळ, हे तो भूभाग त्यांचा देश मानतात. दुसरे तमिळ म्हणजे १९ व्या शतकात ब्रिटिशांनी चहाच्या मळ्यांवर काम करायला नेलेले तमिळ. ते श्रीलंकेच्या मध्य भागात आहेत. त्यांची आताची चौथी पिढी असली तरी त्यांची ओळख भारतीय तमिळ अशीच होते. स्वतंत्र तमिळ राष्ट्राच्या मागणीसाठी (तमिळ एलम) श्रीलंकेच्या सरकारविरुद्ध संघर्ष झाला तो श्रीलंकन तमिळांचा. त्यांचे सव्वा दोन हजार वर्षांपासूनचे वास्तव्य बहुसंख्य सिंहली जनतेला तेव्हापासनूचा साम्राज्यवाद वाटतो.

चहाच्या मळ्यांवर काम करणारे तमिळ वेठबिगारी गुलाम म्हणायला हवेत. त्यांना ना पूर्ण नागरी हक्क, ना पिढ्यान्‌पिढ्या जीवनमान सुधारण्याची आशा. १९४८-४९ ला हे तमिळ श्रीलंकेचे नागरिकच नाहीत असा कायदा झाला. त्यामुळे हे जगातल्या कोणत्याच देशाचे नागरिक राहिले नाहीत. श्रीलंकन तमिळ त्यांना तुच्छ मानतात. कारण हे अशिक्षित मजूर आहेत. श्रीलंकेतील हा सगळ्यात दुबळा सामाजिक स्तर. सरकारने त्यालाच वेठीस धरले. मग श्रीलंकेचे नागरिकत्व हवे असल्यास अर्ज करणे भाग केले. बहुसंख्य मजुरांना ही अर्जाची जरूरीच माहिती नव्हती. अर्जाची प्रक्रियाही क्लिष्ट व वेळकाढू होती. कारण प्रक्रियेचा उद्देश हे लोक नकोतच हा होता. एका अंदाजानुसार साडे-आठ लाख अर्जदारांपैकी फक्त दीड लाखांना नागरिकत्व मिळाले. मग १९६४ ला श्रीलंकेच्या पंतप्रधान सिरिमाओ भंडारनायके व भारताचे पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांनी करार केला. त्यानुसार पाच-सव्वापाच लाख तमिळ भारतात परत पाठवण्यात आले. उरलेल्या तीन-साडे तीन लाखांना श्रीलंकेचे नागरिकत्व मिळाले.

दरम्यान १९५६ साली सिंहली ही एकच अधिकृत भाषा करण्यात आली. विद्यापीठात प्रवेशातून तमिळांना वगळण्यात येऊ लागले. १९८१ ला जाफना येथील विख्यात तमिळ लायब्ररी जाळण्यात आली. नागरिकत्व रद्द करणे, भारतात मोठ्या संख्येने पाठवणे यामुळे लोकसंख्येतील तमिळांचे प्रमाण इतके कमी झाले की, सिंहली बहुमत त्यांना न जुमानता कोणताही कायदा करू शकते. त्यामुळे लायब्ररी जाळण्यासारख्या अवैध कृत्यांनाही मान्यता मिळाल्यासारखी झाली. त्यांचे प्रत्युत्तर म्हणून Liberation Tigers of Tamil Eelam (LTTE) चा जन्म झाला.

त्यांच्या हिंसक कारवायांना धडा शिकवायचा म्हणून १९८३ साली जवळजवळ तीन हजार तमिळांची सरकारच्या मूकसंमतीने राजरोस कत्तल केली गेली. मग तमिळ देशोधडीला लागले. दीड लाख भारतात आले तर मध्यमवर्ग विकसित देशात गेला. भारताने छावण्या उभारून LTTE चे प्रशिक्षण सुरू केले. एकेकाळी अशा २२ छावण्या भारतात होत्या. LTTE चा नेता प्रभाकरन त्यातल्या एका छावणीच्या फोटोत दिसतो. म्हणजे इंदिरा गांधींच्या कारकीर्दीत या साम्राज्यवादाची सुरूवात झाली व तेच धोरण राजीव गांधींनी चालू ठेवले. LTTE चा पाडाव करण्यासाठी श्रीलंका सरकारने हुशार खेळी करून भारताला स्वत:चे सैन्य तेथे मुक्रर करायला लावले. सांगण्याचे कारण श्रीलंकन सरकारी सेना व LTTE तील तणाव कमी करण्याचे होते. त्यानुसार Indian Peace Keeping Force (IPKF) - शांतीसेना - श्रीलंकेत तैनात झाली. १२०० भारतीय सैनिक व ८ ते १० हजार LTTE चे सैनिक मरण पावल्यानंतर या मोहिमेचे अपयश लक्षात आले. मग १९८९ ला विश्वनाथ प्रतापसिंग पंतप्रधान असताना IPKF परतले.

तेव्हापासून २००९ पर्यंत LTTE विरुद्ध श्रीलंका सरकार युद्ध चालू राहिले आणि तमिळ अधिकाधिक अन्यायाचे बळी होत राहिले. LTTE च्या प्रभावाखालील प्रदेशात ते LTTE व सरकारी सैन्य दोन्हींच्या भीतीचे व जुलूमाचे लक्ष्य होते. मग महिंद्र राजपक्ष यांच्या सरकारने ८० हजार ते एक लाख २० हजार लोकांची - त्यात जास्त करून निरपराध - हत्या करून युद्ध संपवले व तो प्रदेश अखत्यारीखाली आणला. अजून तेथे लोक निर्वासित

छावण्यात आहेत. सरकार व बहुसंख्य सिंहली जनता त्यांना देशद्रोही मानते. त्यांचा भविष्यकाळ कठीण आहे.

असे समूह जगभर आहेत. त्यांचे स्वरूप, संख्या व त्यांच्यावरील अत्याचार वाढत आहेत.

**जागतिक सद्य:स्थिती**

उदाहरण म्हणून येथे फक्त तीन वर्तमान प्रक्रियांचा उल्लेख आहे.

**लोकशाही**

निर्वाचित लोकप्रतिनिधी राज्य चालवतात अशी लोकशाही १९९५ पासूनच्या वीस वर्षांत जगभर कमकुवत होताना दिसते. Economist Intelligence Unit, Bertelsmann Stiftung, Freedom House अशा जगमान्य संशोधन संस्थांचे २०१२, २०१३ चे अहवाल हा निष्कर्ष काढतात. संयुक्त राष्ट्रसंघ व त्यांच्या संस्था, आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था, स्वयंसेवी संघटना वगैरे हे अहवाल प्रमाण मानतात. त्यानुसार निम्म्याहून अधिक जगात लोकशाही नाही, तर कोणत्या ना कोणत्या प्रकारची अधिकारशाही आहे. (हुकूमशाही, लष्करशाही, चीनसारखी उमराव-अधिक-लष्करशाही वगैरे).

राजकीय व नागरी स्वातंत्र्ये मान्य असणे. सरकार, उद्योग, प्रसारमाध्यमे, नागरिक यांच्यावर नियंत्रणाचे निश्चित नियम असणे व ते पाळले जाणे; न्यायसंस्था स्वतंत्र असणे व तिचे निर्णय बंधनकारक असणे अशा व्यवस्थेला ‘संपूर्ण’ लोकशाही म्हणता येईल. जगाची लोकसंख्या आज सुमारे सात अब्ज आहे. वरीलपैकी एका अभ्यासानुसार अशा लोकशाहीत यातील फक्त ८० कोटी लोक राहतात. ते जगातील १७९ देशांपैकी २५ देशांत राहतात. दुसऱ्या अभ्यासात लोकशाहीची कसोटी जरा सैल आहे. तरी त्यानुसार साडेचार ते पाच अब्ज लोक खुल्या लोकशाहीखाली नाहीत. ते सदोष लोकशाहीखाली असतील किंवा अधिकारशाहीखाली असतील. २०१२ साली जगातील २७ देशांत लोकशाही राजवटी संपुष्टात आल्या व अधिकारशाही आली. ११ देशांत लोकशाहीच्या दृष्टीने थोडी प्रगती झाली. दुसऱ्या एका अभ्यासानुसार ९० च्या दशकापासून आजवर लोकशाही देशांची संख्या २५ ने कमी झाली.

या परिस्थितीचे दलित चळवळीला अनेक संकेत दिसतात. मुळात निर्वाचित लोकशाही समाजातील दुबळ्या गटांना व अल्पसंख्यांकांना न्याय देऊ शकते हे विवाद्य वाटते. श्रीलंकेतील तमिळ लोकशाहीच्या नावाखाली बहुमतशाहीचे बळी झालेले दिसतात. त्यात अशी लोकशाही देशांतर्गत कमकुवत होत असेल व एकूण जागतिक स्तरावर आक्रसत असेल तर अल्पसंख्यांकांच्या तथाकथित दबाव गटांच्या राजकारणावर अधिकच मर्यादा पडतात.

मग आपले जीवनमान सुधारण्यासाठी देशावर नियंत्रण करणाऱ्या जागतिक वित्तसंस्था, बाजार यांच्याशी थेट देवाण-घेवाण करण्याची शक्यता चळवळीला तपासावी लागेल. उदाहरणार्थ एखाद्या आर्थिक ऐपत असणाऱ्या सच्च्या हितचिंतकांतर्फे शेअर बाजारात व्यवहार करणे.

**युद्धे**

अल्-कईदाच्या पाडावाच्या घोषित ध्येयाने २००१ ला अमेरिकेने अफगाणिस्तानवर युद्ध लादले. आता येथून काढता पाय घेण्याची अमेरिकेला घाई झाली आहे. देशाची परिस्थिती सुधारलेली नाही. जगातील सगळ्यात जास्त अफूचे उत्पादन चालू आहे. मुस्लिम मूलतत्त्ववाद अनेक प्रांतांत शरिया कायदा चालवतो. त्यानुसार प्रथम स्त्रीस्वातंत्र्यावर (जे आधीच तेथे जेमतेम होते) गदा येते. कित्येक गावे अंमली द्रव्यांच्या पूर्णपणे (२४ तास) आहारी गेलेल्या लोकांनी भरलेली आहेत. सामाजिक सुरक्षा काबूलसारख्या राजधानीतही नाही. इतरत्र तर नाहीच नाही. युद्धाने समाजाच्या परिघावरच्या दुबळ्या गटांची संख्या वाढते. या युद्धाने पाकिस्तानवरही परिणाम झालेला आहे. तेथेही अशांतता वाढत आहे व संघर्षग्रस्त प्रदेशात जीवाची हमी नसल्याने अंतर्गत निर्वासित निर्माण होत आहेत.

अफगाणिस्तानच्या पाठोपाठ इराकवर खोट्या कारणांनी युद्ध लादण्यात आले. तेथेही आज अराजक आहे. शिया-सुन्नी वैरात प्रचंड नरसंहार रोज चालू आहे. (१० लाखांहून बळी तर युद्धातच गेले.) इराकशेजारच्या सिरियात गेली दोन-तीन वर्षे यादवी आहे. तेथे राजवटीने आजवर लाखाहून लोक मारले गेले आहेत. २० लाखांहून जास्त निर्वासित झाले आहेत, ती संख्या ३५ लाखांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. अंतर्गत निर्वासित ६० लाखांच्या आसपास असावेत. राजवटीचा अंमल निम्म्या देशावरही चालत नाही. मुस्लिम मूलतत्त्ववाद इराक व सीरिया दोन्हींत सक्रिय आहे आणि या देशांची संयुक्त खिलाफत करण्याचा त्यांचा इरादा आहे. या बळींची मानवी वेदना हा जगातला आजचा महत्त्वाचा आजार आहे.

आर्थिकदृष्ट्या ही युद्धे चालवणारे लष्करी, औद्योगिक प्रकल्प ज्या बँकांकडून पैसा घेतात, त्याच बँका आपल्याला पैसा देतात. या युद्धांची भूक वाढली की आपल्याला मिळणाऱ्या पैशाच्या उसनवारीची किंमतही वाढते. आजवर अमेरिका सीरियापासून तटस्थ आहे. तिने हस्तक्षेप करताच जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार. त्याची झळ प्रत्येक देशातील सगळ्यात खालच्या स्तराला - आपल्याकडे दलित - जास्त बसणार हे उघड आहे.

**विकास**

विकासाच्या मुख्य प्रवाहाच्या संकल्पनेत मुक्त बाजार, भांडवलशाही, शहरीकरण, आंतरराष्ट्रीय अर्थसंस्थांचा हस्तक्षेप अशा सर्वश्रुत घटकांचा समावेश होतो. यानुसार विकास करण्यात आज चीन आघाडीवर आहे. तेथील दोन उदाहरणे घेऊ.

सक्तीच्या शहरीकरणाने पुढील काही वर्षांत २५ टक्के ग्रामीण लोकसंख्या शहरात आणण्याचे शासकीय धोरण चालू झालेले आहे. या विस्थापनाची मानसिक वेदना तर आहेच, पारंपारिक शेतीसारखे ग्रामीण व्यवसाय सोडण्याची सक्ती तर आहेच पण

पुनर्वसनात अनेक त्रुटी आहेत. ज्यांनी पिढ्यान्‌पिढ्या शेतकाम केले त्यांना शहरात राहण्याचे कौशल्य नाही. त्याप्रकारचे प्रशिक्षण दिले जाईल असे आश्वासन देण्यात आले होते ते पाळले गेले नाही. पुनर्वसन ज्या चाळींमध्ये होते, त्या चाळी शासन-कंत्राटदार यांच्या भ्रष्टाचारामुळे निकृष्ट बांधकामाच्या आहेत. गळणारी छते, नीट बंद न होणाऱ्या खिडक्या, गंजक्या लिफ्टस्, वगैरे. दोन-चार एकर स्वत:ची जमीन, स्वत:चे घर असणाऱ्या कुटुंबाला ८०० चौ. फुटांच्या फ्लॅटमध्ये ठेवण्यात आले आहे.

या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी व्यापारी तत्त्वावर शेतीसाठी खासगी उद्योजकांना विकण्यात येतील किंवा त्यावर कारखाने उभारण्यात येतील. १०० एकर जमीन असणारे एक खेडे समजा एका चाळीत पुनर्वसित केले. तर त्याची १०० एकर जमीन बाजारभावाला उपलब्ध होईल अशी योजना आहे. विस्थापितांना मात्र मिळेल तेव्हा शारीरिक मोलमजुरी एवढाच पर्याय आज उपलब्ध आहे.

पर्यावरणाचे चीनमधील चित्र तर भयानक आहे. त्यांच्याच पर्यावरण खात्यानुसार शहरांतील जमिनीखालचे ९० टक्के पाणी प्रदूषित आहे. ११८ मोठ्या शहरांपैकी ६४ शहरांत ही प्रदूषणाची पातळी अत्यंत घातक आहे. ३२ कोटी लोकांना प्यायला शुद्ध पाणी मिळत नाही. १९ कोटी लोक रसायनांनी दूषित पाणी पितात. नद्यांमधील ७० टक्के पाणी पिण्याच्या योग्यतेचे नाही. कित्येक नद्या व त्यांच्या काठावरील गावे कॅन्सरच्या नद्या व कॅन्सरची गावे म्हणून ओळखली जातात. या पाण्याने होणाऱ्या कॅन्सरचे प्रमाण तेथे उर्वरित देशाच्या दीडपट आहे.

आपल्याकडील विकासही बहुधा असाच चालू आहे. परत त्यात गरीबच जास्त भरडला जात आहे किंवा जाणार आहे, हे भान असावे.

**निरीक्षण**

निरीक्षण जात व धर्मापुरते मर्यादित आहे. भारतातील प्रत्येक जात हे एक राष्ट्र आहे व जात हा साम्राज्यवाद आहे - या विचाराच्या अनुषंगाने साम्राज्यवादाचे देशाबाहेरचे लागेबांधे पहावे लागतील. ब्लॅक पँथर्सच्या तत्त्वज्ञानात ही संगती दिसते. अमेरिका घरात जे करते तेच बाहेर करते ही ती संगती. जात हे भारताचे वैशिष्ट्य मानले की त्या साम्राज्यवादाला ही बाहेरची संगती मिळत नाही. उदाहरणार्थ दलित पँथर्सच्या आधीची भारत-पाकिस्तान युद्धे किंवा श्रीलंका-तमिळ-भारत प्रश्न किंवा बांगलादेशाची अगदी तत्कालिन निर्मिती या घटनांनी हे शेजारी देश (श्रीलंका, बांगलादेश, नेपाळ, भूतान, ब्रह्मदेश) भारताला साम्राज्यवादी समजतात. त्यावर चळवळीने भूमिका घेणे अपेक्षित होते व भावी चळवळींकडून अपेक्षित आहे. सीमांकित साम्राज्यवाद अतार्किक ठरू शकतो. म्हणून जागतिक परिप्रेक्ष्यात श्रीलंकेतील तमिळांचे उदाहरण दिले आहे.

जातीबरोबरच अपरिहार्यपणे चळवळीला धर्माबाबत निश्चित भूमिका घ्यावी लागेल. प्रथम हे नि:संदिग्धपणे व नम्रपणे नमूद करतो की मला कोणत्याही धर्मव्यवस्थेबद्दल, प्रेषिताबद्दल अनादर नाही. माझा तो अधिकार नाही पण मला ती मितीही नाही आणि त्यात गतीही नाही. त्यामुळे माझे मत केवळ इहवादी किंवा भौतिक मर्यादेत आहे.

जागतिक परिप्रेक्ष्यात प्रमुख म्हणून फक्त तीन उदाहरणे दिली आहेत. अशा अनेक प्रक्रिया चालू आहेत आणि त्या धर्मबाह्य आहेत. तंत्रज्ञानाच्या विकासाने बलुतेदारी नष्ट झाली आणि काही जातींची उपजीविकाच संपली. ही प्रक्रिया धर्मबाह्य होती पण तिने जातिव्यवस्थेवर निश्चित व दूरगामी परिणाम केला. त्यामुळे जात व धर्म यापुरते विचारमंथन मर्यादित ठेवले तर उद्याच्या चळवळीला दिशा मिळणार नाही. याचे कारण म्हणजे मुळात वर्ण ही स्थैर्य देणारी संकल्पना किंवा व्यवस्था आहे. तिच्याकडून 'क्रांती' दूरच, चळवळीचीही अपेक्षा चूक आहे. एकविसाव्या शतकातील प्रबोधनाची, सामाजिक न्यायाची कोणतीही चळवळ धर्मातीत असायला हवी. प्रस्थापित व रूढ तर सोडाच कोणत्याही नव्या धर्मानेसुद्धा 'क्रांती' होणार नाही. फार तर काल रजनीश (ओशो), आज रामदेवबाबा, रविशंकर, विपश्यना असे भौतिक गरजा भागलेल्या उच्चभ्रू वर्गाला मानसिक मृगजळे दाखवणारे पंथ निर्माण होतील. दलित चळवळीला अभिप्रेत काय आहे हे ठरवावे लागेल. त्यासाठी 'जात' ही अंधश्रद्धा आहे यादृष्टीने विचार व्हावा असे वाटते. मांत्रिक वास्तवातला माणूस असला आणि त्याच्यावर विश्वास ठेवणारी वास्तवातील माणसे असली तरी अंधश्रद्धा अंधश्रद्धाच राहते. ती दूर केल्याखेरीज त्या भक्तांच्या जीवनात श्रेयस्कर फरक पडणार नाही किंवा संभाव्य बळींवरचा अन्यायही दूर होणार नाही. मांत्रिकाला गावातून हाकलणे हा उपाय नाही, ते स्वप्नरंजन आहे. कारण मांत्रिक ही गावाच्या अंधश्रद्धेची गरज आहे. एक मांत्रिक गेला तर दुसरा उभा राहील. धर्माच्या बाबत व म्हणून जातीबाबत तेच म्हणता येईल.

शिवाय कोणताही धर्म पुरेसा संदिग्ध असतो. ज्याला हवा तसा अर्थ त्यातून काढता येतो. मार्टिन ल्यूथर किंगला ज्या ख्रिश्चन धर्मात आफ्रिकन-अमेरिकनांच्या कल्याणासाठी उदात्त तत्त्वे सापडली तोच ख्रिश्चन धर्म आक्षेपार्ह वाटून माल्कम एक्सने धर्मांतर केले किंवा आजच्या स्थितीत कडवे मूलतत्त्ववादी ज्या धर्मग्रंथांचा हवाला देतात त्याच धर्मग्रंथांचा हवाला त्यांचे त्याच धर्माचे विरोधक देतात, अशी संदिग्धता चळवळीला परवडणारी नसते. तिला निश्चित व मुद्देसूद कार्यक्रम लागतो. भूतकाळाची ओझी शक्यतो बाजूला ठेवून असा कार्यक्रम भावी चळवळींना देणे उचित वाटते.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***
*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

❑